रविवार दि.११ ऑगस्ट२०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : ३४३
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

# दैनिक लोकनेता

बीड
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com

# शेतकरी, शेतमजुरांसाठी मी काही ही निर्णय घेऊ शकतो:बच्चू कडू

## बच्चू कडू शरद पवारांच्या भेटीला, विधानसभेपूर्वी महायुतीला खिंडार पडणार?

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

पुणे (वृत्तसंस्था)

प्रहार संघटनेचे आमदार हे विधानसभा निवडणुकीपूर्वी आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहे. ९ ऑगस्ट रोजी छत्रपती संभाजीनगरमध्ये भव्य मोर्चा काढल्यानंतर दुसऱ्याच दिवशी ते थेट शरद पवार यांच्या भेटीला पोहोचले आहेत. पुण्यातील शरद पवार यांच्या मोदीबागेत या दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली आहे. यावेळी प्रसार माध्यमांनी त्यांना शरद पवारांसोबत जाणार का असा प्रश्न केला असता शेतमजूर, दिव्यांगांसाठी आम्ही काहीही करू असे सूचक विधान त्यांनी केले आहे. दरम्यान, सकाळी सकाळी बच्चू कडू अचानक शरद पवार यांच्या भेटीला पोहोचल्या राज्याच्या राजकारणात आता तर्क वितर्क लावले जात आहेत.

या भेटीपूर्वी बच्चू कडू यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला आहे. ते म्हणाले, शरद पवार यांच्यासोबतची ही भेट पूर्वनियोजित होती. जे मुद्दे समोर ठेवत छत्रपती संभाजीनगरमध्ये मोर्चा काढला त्याच मुद्द्यांवर आज शरद पवार यांच्याशी चर्चा करणार आहे. जाती-धर्मांवर राजकारण होते, तसेच शेतकरी, शेतमजुरांच्या मुद्यावरही राजकारण झाले पाहिजे. हेच मुद्दे आज शरद पवार यांच्यासमोर मांडणार आहे. या मुद्द्यांवर इतर पक्ष सहमत होतील का यासाठी प्रयत्न सुरू आहे'', असे कडू म्हणाले.पुढे तुम्ही शरद पवार यांच्यासोबत दिसणार का असा सवाल त्यांना करण्यात आला. त्यावर ते म्हणाले, अजून तरी तसे काही चित्र नाही. आम्ही एक सप्टेंबरपर्यंत सरकारला वेळ दिलेली आहे. तोपर्यंत कोणताही निर्णय घेणार नाही असे बच्चू कडू यांनी स्पष्ट केले आहे. तसेच महायुतीमध्ये तुम्ही नाराज आहात का? या प्रश्नावर आमची नाराजी महत्त्वाची नाही तर शेतकरी, शेतमजुरांचे प्रश्न महत्त्वाचे आहेत. बच्चू कडू स्वतःसाठी कधीच नाराज नसतो'', असे त्यांनी स्पष्ट केले.पुढे ते म्हणाले, मला अंपग, शेतकरी, मजुर यांचे प्रश्न महत्वाचे आहेत. हे प्रश्न सोडवणं महत्वाचे आहे. त्यासाठी मी काहीही निर्णय घेऊ शकतो. या मुद्यावरूनच कोणाबरोबर जायचे याचा निर्णय होईल'', असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. एक सप्टेंबरपर्यंत कोणी काहीही ऑफर दिली तरी निर्णय घेणार नाही. याबाबत शरद पवार, यांच्यासह इतर पक्षांचे काय मत आहे ते जाणून घेत आहे'', असे ते म्हणाले.या भेटीनंतर खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या, शेतकरी, दिव्यांग यांच्यासाठी चांगले काम बच्चू कडू करत आहेत. महाराष्ट्रासाठी चांगल्या लोकांनी एकत्र काम करावे अशी माझी इच्छा आहे. बच्चू कडू महाराष्ट्रातील महत्त्वाचे नेते आहेत. असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.दरम्यान, पवारांच्या भेटीनंतरही त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला आहे. शेतकरी, शेतमजूर, दिव्यांग यांच्या प्रश्नाव्यतिरिक्त आमच्या डोक्यात काहीच नाही. या मुद्द्यांचे आमची राजकारण करण्याचा प्रयत्न करत आहोत. हे मुद्दे चर्चेत आले पाहिजे'', असे ते म्हणाले. दरम्यान, बच्चू कडू यांनी सरकारला मुदत दिलेली असताना आता सरकारकडून याबाबत काही पावले उचलली जातात का ते पाहणे महत्त्वाचे असणार आहे.



# कल्याण बोराडे यांचा काँग्रेसच्या उमेदवारीवर दावा

## काँग्रेस प्रमुख नेत्यांची घेतली भेट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मंठा । प्रतिनिधी

तालुक्यातील आकणी येथील यश यशस्वी उद्योजक सरपंच कल्याणराव बोराडे यांनी परतूर विधानसभा मतदार संघातून काँग्रेसकडून विधानसभेच्या उमेदवारीची मागणी केली आहे.या संदर्भात बोराडे यांनी प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले,माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्यासह इतर नेत्यांच्या भेटी घेतल्या आहेत.काँग्रेस पक्षाकडे रीतसर अर्ज करून आवश्यक तो पक्ष निधी जमा करत बोराडे यांनी उमेदवारी मागणीचा अर्ज दाखल केला आहे.परतूर मतदार संघात विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून तसेच जनकल्याण



नावाने गावा गावत शाखा स्थापन केलेल्या असून मतदार संघात कल्याणराव बोराडे अनेक वर्षांपासून सक्रिय आहेत.परतूर, मंठा तालुक्यात सर्व जाती धर्मात त्यांना मानणारा मोठा वर्ग आहे.मागील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये त्यांनी आपला ठसा उमटविला आहे.उद्योजक असल्याने त्यांची व्यापारी वर्गा सोबतच सरपंच असल्याने जनसामान्य नागरिकांशी नाळ जोडली गेली आहे.

गेली अनेक वर्ष कल्याणराव बोराडे काँग्रेस पक्षासोबत एकनिष्ठ आहेत. सत्ताधारी पक्ष आणि त्या पक्षाचे स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या विरोधात सर्वसामान्य जनतेत प्रचंड नाराजी आहे.आणि दुसऱ्या बाजूने कल्याणराव बोराडे यांची परतूर मंठा मधील लोकप्रियता पाहता सत्ताधारी पक्षाच्या विरोधात जनमत एकवटले आहे.आगामी काळात पक्षश्रेष्ठी आपल्या उमेदवारीबाबत सकारात्मक निर्णय घेतील, परतूर मतदारसंघात काँग्रेसचा विजय निश्चित असल्याची प्रतिक्रिया बोराडे यांनी यावेळी दिली.

### दि वाशिम अर्बन को-ऑपरेटिव बँक लिमिटेड शाखा उमरखेड यांना

# कॉलिटी कंट्रोल म्हणून प्रथम पारितोषिक देऊन गौरविण्यात आले

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

उमरखेड । सय्यद रहीम राजा

दि वाशिम अर्बन को-ऑपरेटिव बँक लिमिटेड वाशिम यांची नुकतीच दिनांक ६ ऑगस्ट २०२४ रोजी वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली.

यामध्ये सर्व १२ शाखे मधून प्रत्येक शाखेच्या त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीवर मुख्य कार्यालयाकडून पारितोषिक जाहीर करण्यात आले.

त्यानुसार दि वाशिम अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड ली.शाखा उमरखेड यांना कॉलिटी कंट्रोल म्हणून प्रथम पारितोषिक वाशिम बँकेच्या अध्यक्षा राठी मॅडम व उपाध्यक्ष पुरुषोत्तमजी चरखा यांच्या हस्ते उमरखेड शाखेचे शाखा सभापती नारायणदासजी भट्टड आणि शाखा व्यवस्थापक शेषराव जाधव यांना पुरस्कार देऊन तसेच शाल श्रीफळ देऊन गौरविण्यात आले.यामुळे तालुक्यातून दि. वाशिम अर्बन को-ऑप बँक लि.उमरखेड शाखेवर खातेदार व नागरिकांकडून अभिनंदन पर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



**या प्रथम पारितोषीकाचे संपूर्ण श्रेय शाखा सभापती, सर्व शाखा समिती सदस्य तसेच कर्मचारी प्रशांत पाटील, बबन चव्हाण, राजेश खंडेलवाल सिध्दांर्थ श्रवले जगदिश जाधव यांना देण्यात येतो तसेच बँके कडून ग्राहकाचे सेवेकरीता नुसतीच गुगल पे,फोन पे, पेटीएम,भीम प सेवा सुरू करण्यात आली आहे ग्राहकांना ऑनलाइन पेमेंटचा वापर करावे अशी विनंती.शाखा व्यवस्थापक शेषराव जाधव यांनी ग्राहकांना केली आहे.**

## राख्या बांधणाऱ्या बहिणींच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

सिन्नर (वृत्तसंस्था)

आजपर्यंत मला कधीही एवढ्या राख्या कोणी बांधल्या नाहीत, तेवढ्या राख्या या तीन दिवसात महिला भगिनींनी बांधल्या आहेत. मात्र, या महिला भगिनींच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही, असा शब्द उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जनसन्मान यात्रेदरम्यान उपस्थित महिलांना दिला आहे. आर्थिक शिस्त मला कळते. मागील दहा अर्थसंकल्प मी सादर केले आहेत. हे कोण्या येड्या गबाळ्याचे काम नाही. त्यामुळे सर्व विचार करूनच लाडकी बहिण योजना जाहीर केली असल्याचा दावा देखील अजित पवार यांनी केला आहे. जनसन्मान यात्रेनिमित्त सिन्नर येथे आयोजित सभेत ते बोलत होते.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यात जनसन्मान यात्रेचे आयोजन केले आहे. या यात्रेनिमित्त ते महिला भगिनींशी संवाद साधत आहेत. त्यातच अनेक ठिकाणी महिलांकडून त्यांना राखी बांधली जात आहे. या संदर्भात बोलताना अजित पवार यांनी माझ्या या महिला भगिनींच्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही, असा शब्द दिला.

# उत्कृष्ट तलाठी पुरस्काराने दिपाली अष्टुरे हिमगिरे सन्मानित

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

धर्माबाद । साहेबराव दुगाने

उपविभागीय कार्यालयात कार्यरत असलेले तलाठी श्रीमती अष्टुरे दिपाली हिमगिरे यांना महसूल पंधरवड्यात नुकताच जिल्हाधिकारी माननीय अभिजीत राऊत, श्रीमती मेघना कावली मॅडम प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी .श्रीमती मिनल करनवाल मॅडम मुख्य कार्यकारी अधिकारी नांदेड,म निवासी उपजिल्हाधिकारी श्री महेश वडदकर साहेब , अप्पर जिल्हाधिकारी श्री पी. एस. बोरगावकर साहेब उपविभागीय अधिकारी श्रीमती स्वाती दाभाडे मॅडम यांच्या उपस्थितीत उत्कृष्ट तलाठी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले .



गेल्या अनेक वर्षापासून महसूल विभागाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे जनसामान्यापर्यंत पोहोचण्यात काम तलाठी मॅडम करतात. तलाठी पदावर कार्यरत असताना नैसर्गिक आपत्ती , ई -फेरफार ,पांदन रस्ते ,पी -एम किसान योजना ,तलावातून गाळ काढणे त्यासोबतच राशन कार्ड ,श्रावण बाळ दिव्यांग ,विधवा आधीच्या योजना प्रभावीपणे कॅम्प लावून सोडवलेले आहे.आपण समाजाचे काही देणे आहे या उद्देशाने शेतकरी खातेदाराप्रती आस्था व प्रेम बाळगून वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मदतीने प्रशासनात आपल्या कार्याचा ठसा प्रभावीपणे उमटविला आहे. आजतागायत जारिकोट, चिकना, येताळा ,येवती सझाचे काम प्रभावीपणे केलेले आहे. दरवर्षी शंभर टक्के महसूली उद्दिष्ट पुर्ण करणे,सोबतच पीक कापणी प्रयोग शासनाच्या वतीने दिले जाणारे विविध अग्रीम रक्कम शेतकऱ्यांना मिळवून देणे ही कामे तंतोतंत पुढाकाराने नेहमीच पार पडतात. त्याच्यीच पावती म्हणून त्यांना उत्कृष्ट तलाठी पुरस्कारासाठी उपविभागीय अधिकारी सौ.स्वाती दाभाडे मॅडम यांनी त्यांच्या नावाची शिफारस वरिष्ठ कार्यालयाकडे केलेली होती.उत्कृष्ट तलाठी पुरस्काराने सन्मानित केल्यामुळे उपविभागीय अधिकारी स्वाती दाभाडे मॅडम, तहसीलदार श्री महिंद्रकर साहेब, नायब तहसीलदार श्री इंदुरकर साहेब श्री गावंडे साहेब,मंडळ अधिकारी तलाठी व कर्मचाऱ्यांनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केलेले आहे .महसुली कार्य करीत असताना साहित्य क्षेत्रात ही त्यांचे चांगले योगदान असून लवकरच त्यांचा कूस पहिला कविता संग्रह वाचकांच्या भेटीला येणार आहे. कवयित्री तलाठी श्रीमती दिपाली अष्टुरे(हिमगिरे)ह्या हुतात्मा पानसरे प्राथमिक शाळेत कार्यरत असलेले उपक्रमशील शिक्षक विठ्ठल हिमगिरे यांच्या सौभाग्यवती असून त्यांचा मिळालेल्या पुरस्काराबद्दल राजकीय ,सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातून, शेतकरी, पत्रकार बांधवाकडून शुभेच्छाचा वर्षाव होत आहे. त्यांना मिळालेले पुरस्कार ही त्यांच्या खऱ्या अर्थाने कामाची पावती आहे.

## चारोळी

काळ्या मातीच्या सेवेत
भाऊरायाने आयुष्य अर्पिले
टिपूर मोत्यावाणी धान येता
काळजात ते क्षण जपिले.

रंजना सानप
मायणी (सातारा)



**दयानंद विद्यालय हाडोळती येथील मराठी विषयाचे ज्येष्ठ शिक्षक कदम शशिकांत इरवंतराव यांना दयानंद विद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या वतीने व श्रीहरी प्राथमिक विद्यामंदिर शाळेतील कर्मचाऱ्यांच्या वतीने शाल व पुष्पहार घालून त्यांचा ५८ वा वाढदिवस साजरा केला.(छाया:- बाजीराव गायकवाड लोकनेता न्युज नेटवर्क नांदेड)**

# आष्टी तालुक्यात बीएसएनएलची ५ जी सिम कार्ड वाटप सुरूवात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । राजू म्हस्के

सध्याच्या काळात मोबाईल रिचार्ज चे दर भरमसाठ वाढल्याने गोरगरिबांना मोबाईल वापरणे कठीण झाले आहे.मोबाईल वापर काळाची गरज असल्याने तो वापरावा लागतो आणि सर्व सामान्यांना त्याचे दर परवडले पाहिजे याची जाणीव म्हणून बीएसएनएलने माफक दरात रिचार्ज ठेवले असून, स्पर्धेच्या युगात ५ जी सिम वाटप ची सुरुवात आज पासून आष्टी तालुक्यात करण्यात आली आहे.गोरगरिबांची ओळख असलेले बीएसएनएल सेवेचा लाभ घ्यावा आवाहन बीएसएनएल अधिकारी राहुल खेडकर यांनी केले.



आष्टी तालुक्यात आज दि.९ पासुन ५ जी सिम कार्ड वाटप सुरुवात शहरातील गुरुकृपा मोबाईल शॉपीमध्ये ग्राहकांना ५ जी प्रायोगिक सिमकार्ड देऊन शुभारंभ करण्यात आला.यावेळी भारत संचार निगम लिमिटेड चे अधिकारी खेडकर बोलत होते. यावेळी महाराष्ट्र सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुध्दे,आष्टी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रविण पोकळे,गणेश दळवी, ग्रामपंचायत सदस्य अक्षय हळपावत,सुनिल नरवडे, विक्रेते प्रितम बोगावत,समिर पोकळे आदि उपस्थित होते.

# राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाच्या वतीने आयोजित साखर उद्योग परिसंवाद व कार्यक्षमता पुरस्कार सोहळा संपन्न

## माजी.मंत्री हर्षवर्धन पाटील यांचे अमित शहा यांनी केले कौतुक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दिल्ली | बबनराव धायतोंडे**



राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाच्या वतीने आयोजित साखर उद्योग परिसंवाद व कार्यक्षमता पुरस्कार सोहळा २०२२-२३ आज दिल्ली येथे केंद्रीय गृहमंत्री व सहकारमंत्री मा.अमित शाहा यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न झाला. यावेळी देशातील उत्कृष्ट साखर कारखान्यांचा विशेष गौरव पुरस्कार देऊन करण्यात आला.तसेच राष्ट्रीय पातळीवरील सेमिनार देखील संपन्न झाले.साखर उद्योगातील काही प्रश्न, धोरणात्मक बाबी या सगळ्या विषयावर चर्चा झाली.यामध्ये देशातील साखर उद्योगातील प्रमुखांना आमंत्रित केले होते.यावेळी कमीत कमी क्षेत्रात,कमी खर्चात तसेच कमी पाण्यात उत्पादकता कशी वाढेल,साखर रिकव्हरी कशी वाढेल,येणाऱ्या काळात कोणत्या उसाच्या जातींना प्राधान्य द्यावे लागेल,याबाबत सविस्तर चर्चा झाली. तसेच साखर उद्योगात जी पॉलिसी आहे,त्यात काही बदल करायची गरज आहे.याबाबतचे मुद्दे देखील यावेळी मांडले.तसेच साखर किमान विक्री दर ४२ रुपये, इथेनॉलच्या दरात वाढ,साखर निर्यात धोरण आणि येणाऱ्या १० वर्षातील साखर उद्योगाचे धोरण यावर सविस्तर चर्चा झाली.वेगवेगळ्या साखर तज्ञांनी देखील मार्गदर्शन केले.तसेच त्यांच्या दृष्टीने महत्वाच्या असणाऱ्या गोष्टींवर मत मांडले.साखर उद्योगाचे अनेक प्रश्न अमित शहा साहेब यांच्या विभागाशी संबंधित आहेत,यामुळे त्यांनी देखील यावेळी अनेक प्रश्न मार्गी लावण्याच्या सुचना तत्काळ केल्या.या सगळ्या गोष्टींचा एकच उद्देश आहे की,आपल्या शेतकऱ्यांना कशा प्रकारे जास्तीचा बाजारभाव आपल्याला देता येईल. येणाऱ्या काळात देखील छत्रऊडक्र व छउऊ या संस्थेच्या माध्यमातून आपण शेतकऱ्यांना काहीही कमी पडू देणार नाही.असा मला विश्वास आहे की केंद्र सरकारच्या माध्यमातून आपण आपला साखर उद्योग अजून मजबूत करून तो वाढवणार आहे.असे .केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी सांगितले.आणि माजी.मंत्री हर्षवर्धन पाटील यांचे कौतुक केले.

### लाडकी सत्ता मिळवण्यासाठी चाललेली केविलवाणी धडपड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

सत्ताधाऱ्यांना लाडकी बहीण नाही तर लाडकी सत्ता हवी आहे. लाडकी सत्ता मिळवण्यासाठी चाललेली ही केविलवाणी धडपड असल्याची टीका काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी केली आहे. मात्र, जनता हे सगळे ओळखून आहे. लोकांनी सगळे अनुभवले आहे. त्याचा एवढा ठसा उमटलेला आहे की आता गुलाबी करून काहीही होईल असे वाटत नसल्याची टीका देखील बाळासाहेब थोरात यांनी केला आहे. या माध्यमातून बाळासाहेब थोरात यांनी अजित पवार यांच्या जनसन्मान यात्रेवर टीका केली आहे.अजित पवार यांच्या जनसन्मान यात्रेत सर्वत्र गुलाबी रंग दिसत आहे. यावरून बाळासाहेब थोरात यांनी अजित पवार यांना चांगलेच सुनावले. रंग गुलाबी करून काय उपयोग आहे? लोकांनी सगळे तुमचे अनुभवलेले आहे. त्याचा असा ठसा उमटला की आता गुलाबी करून काही होणार नाही, अशा शब्दात बाळासाहेब थोरात यांनी अजित पवार यांच्यावर निशाणा साधला आहे.नाशिक ते मुंबई हा प्रवास तीन तासांमध्ये आपण करत होतो. मात्र आता त्याच प्रवासाला पाच ते सहा तास लागत आहेत. कधी कधी एकाच जागेवर पाच पाच तास लागत आहेत.

# शेकडो युवकांचा शिवसेना उ.बा.ठा.मध्ये प्रवेश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार | विनायक कुटे**



लोणार १० शेकडो युवकांचा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात, जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे व शहरप्रमुख गजानन जाधव यांच्या हस्ते प्रवेश

भगव्या सप्ताह निमित्त शिवसेना भवन लोणार येथे आयोजित कार्यक्रमात लोणार तालुका ग्रामीण भागातील शेकडो युवक उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या कर्तुत्वावर विश्वास ठेवून शिवसेनेत प्रवेश घेण्यासाठी लोंढेच्या लोंढे येत आहेत ४ ते ११ ऑगस्ट हा भगवा सप्ताह महाराष्ट्रभर साजरा होत आहे यानिमित्त प्रत्येक तालुक्यात विविध कार्यक्रम घेण्यात येत आहेत जसे प्राथमिक सदस्य नोंदणी, समाज उपयोगी कार्य, प्रवेश सोहळे, त्यातीलच एक भाग म्हणून आज शेकडो तरुण युवकांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे व लोणार शहर चे शहर प्रमुख गजानन जाधव यांच्या हस्ते शिवसेना भवन लोणार येथे प्रवेश सोहळा पार पडला याप्रसंगी विभाग प्रमुख राजूभाऊ बुधवत, युवा सेनेचे शहर प्रमुख श्रीकांत मादनकर, युवा सेनेचे तालुका उपप्रमुख अमोल सुटे, जेष्ठ शिवसैनिक सुदन अंभोरे शहर संघटक तानाजी मापारी तानाजी अंभोरे गणेश पाठे प्रसेंजित बछिरे हे प्रामुख्याने उपस्थित होते.

## मानव सेवा हीच ईश्वर सेवा-सटवाजी पवार

# दैनिक प्रबुद्ध वृत्तपत्रातून आईला मदत करा ही बातमी व्हायरल झाल्यामुळे अनेक लोकांनी केली आईला मदत



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड | सय्यद रहीम राजा**

तालुक्यातील आणखी परिसरातील सावळेश्वर या गावावर दिनांक २६ जून २०२४ रोजी दोन मुलींना गावा ला लागून असलेल्या नदीत बुडत असलेले पाहून चेतन नावाचा मुलगा त्या दोन मुलींना वाचण्यासाठी गेला असता लगेच बुडत असणाऱ्या मुली भयभीत झालेल्या असल्यामुळे त्यांनी चेतन देवानंद काळबांडे ला कवटाळून वर येण्याचा प्रयत्न केला पण तो असफल झाल्याने नदीत बुडून तिघांचाही दुर्दैवी मृत्यू झाला.

ही गोष्ट वाऱ्यासारखी संपूर्ण तालुक्यात पोहोचली. सावळेश्वर गावावर दुःखाचा डोंगर कोसळला होता.चेतन हा घरातील कर्ताधर्ता नवतरुण होता त्याच्यावर सर्व कुटुंब चालत होते काही वर्षांपूर्वीच त्याचे वडिलाचे अपघाती मृत्यू झाल्याने सर्व कुटुंबाची जबाबदारी आई आणि चेतन यावर आली होती.

घरामध्ये अजून दोन मुली असून एक मुलगी अपंग आहे.

दैनिक प्रबुद्ध परिवार व दैनिक...लोकनेता पत्रकार या वृत्तपत्रामधून प्रकाशित झालेली आईला मदत करा ही बातमी व्हायरल झाल्यामुळे हिमायतनगर तालुक्यातील जवळगाव जिल्हा नांदेड येथील सटवाजी पवार सर संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष

रयत सेवाभावी प्रतिष्ठान जवळगाव यांनी पीडित आईला मदत म्हणून ११०००रू अकरा हजार रुपयाचा किराणामाल देऊन एक मोठी मदत केली आहे.

सटवाजी पवार यांनी यावेळी चेतनच्या कुटुंबावर जो दुःखाचा डोंगर कोसळला आहे आणि चेतनची जागा कोणीही आणि कितीही पैसे दिले तरीही भरून निघणार नाही पण माझ्या प्रतिष्ठानाकडून ही मदत करत आहो ही मदत कोणत्याही राजकीय पक्षाकडून नसून सामान्य जनतेकडून एक एक पैसा जमा करून मानव सेवा हीच ईश्वर सेवा ही सद्भावना मनामध्ये ठेवून पीडित आईला मदत करीत आहो. आणि ही बातमी पत्रकार सिद्धार्थ दिवेकर उमरखेड तालुका प्रतिनिधी दैनिक प्रबुद्ध परिवार यांनी मराठवाड्यातील अनेक ग्रुपमध्ये सेंड करून माझ्यापर्यंत पोहोचल्यामुळे मी ही मदत केली आहे असे प्रतिपादन यावेळी सटवाजी पवार यांनी केले.

यावेळी दहीभात सर, सुनिल लोखंडे, पत्रकार सिध्दार्थ दिवेकर, शिवाजी काळबांडे तंटामुक्ती अध्यक्ष, विवेक रावते सामाजिक कार्यकर्ते, अनिल कांबळे पोलीस पाटील, माधव रावते, अमोल काळबांडे इत्यादी अनेक नागरिक मोठ्या संख्येत उपस्थित होते.

### रोहि

व्यभिचाराच्या गोष्टी इतक्या काही घडल्या
कशा तडकुनी संस्कारांच्या भिंती पडल्या

नवरी झाली पोर लाडकी बाप बिलगला
मांडवातल्या पोरीबाळी इतक्या रडल्या

सवय तिची त्या घरास होती झाली इतकी
ती नसल्यावर जागोजागी गोष्टी अडल्या

ऐकुन घेते..शांत राहते..हसुन बोलते
सोशिकतेच्या सवयी माझ्या मलाच नडल्या

महाग झाले जगणे इतके म्हणता म्हणता
चैनीच्याही गोष्टी इतक्या का परवडल्या?

मी इच्छांच्या शृंखलेतले जगणे जगते
अपुऱ्या इच्छा जागोजागी का धडपडल्या?

काळामधले रहस्य रोही सखोल कळले
संकट आले काही गोष्टी मग उलगडल्या

**-रोहिणी पांडे**

# स्वातंत्र्यदिनी समता बालवैज्ञानिक म्हणून सम्यक कांबळेचा होणार सन्मान


■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | बाजीराव गायकवाड**



समता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय उस्माननगर ( मोठी लाठी ) ता.कंधार येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा बक्षीस देऊन शाबासकीची थाप दिली जाते. कै. विनायकराव देशमुख यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शालेय विद्यार्थी बाल वैज्ञानिक सम्यक लक्ष्मण कांबळे याचा २०२४ चा समता वैज्ञानिक म्हणून स्मृतीचिन्ह व रोख रक्कम देऊन पुरस्काराने गौरविण्यात येणार असल्याचे संस्थेचे संचालक प्रदीप देशमुख यांनी दैनिक लोकनेता नांदेड जिल्हा प्रतिनिधी बाजीराव गायकवाड पाटील यांच्यासोबत बोलताना जाहीर केले आहे. दरवर्षी समता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित समता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय उस्माननगर (मोठी लाठी) ता.कंधार येथे दहावी , बारावी , शिष्यवृत्ती , व अन्य स्पर्धात्मक परीक्षेत घवघवीत यश मिळालेल्या आणि ज्यांनी शक्कल लढवून नाविन्यपूर्ण उपक्रम बनविले अशा विद्यार्थ्यांचा सत्कार करून शाबासकीची थाप दिली जाते. २१ व्या शतकात भारत चंद्रावर पाऊल ठेवत आहे. देशात नवीन पिढी विविध प्रकारचे शोध लावताना पाहतोय ऐकतोय अशा प्रकारे उस्माननगर येथील समता विद्यालयातील दहावीतील विद्यार्थी बालवैज्ञानिक सम्यक लक्ष्मण कांबळे यांने कुलर व गाडी चालवताना चालकाला झोप येत असताना धोक्याची सुचना देणारे यंत्र तयार केले आहे. त्याच्या शोधकार्याची दखल घेऊन संस्थेचे संचालक प्रदीप देशमुख यांनी यंदाच्या १५ ऑगस्ट रोजी भारतीय स्वातंत्र्यदिनी कै. विनायकराव देशमुख यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ समता वैज्ञानिक२०२४ चा मानकरी सम्यक लक्ष्मण कांबळे याला बालवैज्ञानिक म्हणून स्मृतीचिन्ह व रोख रक्कम देऊन पुरस्काराने गौरविण्यात येणार असल्याचे कळविले आहे. यावेळी गावातील विविध मान्यवर , नागरिक विद्यार्थ्यांचे बक्षीस देऊन सत्कार करणार आहेत. पत्रकार संघाचे सचिव तथा संस्थेचे तरूण संचालक प्रदीप देशमुख हे नेहमी शाळेत विधायक उपक्रम राबविण्यासाठी उत्सुकतेने पुढे येतात.पत्रकार संघाचे कोषाध्यक्ष व श्रमिक एकजूट चे उस्माननगर प्रतिनिधी लक्ष्मण कांबळे यांचे सम्यक कांबळे चिरंजीव आहेत.

### चित्रकाव्य



लोकनेता न्यूज नेटवर्क

खबरदारी घ्यावी बोलताना
भिंतीलाही असतात कान
कुठे काय बोलावे याचे
ठेवावे माणसाने भान

एकाकडून दुसऱ्याकडे
गैरसमजाचे पेटते रान
अफवा अशा पसरती की
जातो कधीकधी खऱ्याचा प्राण

आवडते काही लोकांना
इतरांच्या आयुष्यात डोकवायला
कुजबुजण्याचा छंद आगळा
विचित्र वृत्ती लागते सोकवायला

काय खरे, काय खोटे
वेळीच शहानिशा करा
कानमंत्र इतरांचा ऐकण्याचा
आजार टाळलेलाच बरा

संपुष्टात येतात मग
कित्येक चांगली नाती
पश्चातापच उरतो फक्त
नंतर माणसाच्या हाती

कोणीही फितवू शकेल
हलक्या कानाच्या व्यक्तीला
ऐकावे जनाचे करावे मनाचे
म्हणून वापरावे या उक्तीला

**रुपाली तुकाराम भोरकडे, शिक्रापूर.**
**शिक्रापूर: -(बबनराव धायतोंडे)**

# सर्वसामान्यांच्या जिवाशी खेळणारा दुध भेसळीतला एक आरोपी अजूनही फरार;आरोपी शोधण्यासाठी पथक रवाना

## आ.धस सोडता इतर नेत्यांची भूमिका अळीमिळी गुपचिळी सारखी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | राजू म्हस्के**

पैसे कमविण्यासाठी कोण कसा व्यवसाय करून आपले उखळ पांढरे करण्यासाठी नामी शक्कल लढवितात.असाच प्रकार आष्टी तालुक्यात पुन्हा एकदा सुरू झाल्याने,पाढं-या दुधावरच्या,काळ्या बोक्यांनी पुन्हा डोकेवर काढले आहे.चार दिवसापूर्वीच कडा व टाकळी येथील दुध संकलन केंद्रावर स्वत: जिल्हाधिकारी यांनी छापा टाकुनी,दुधात मिसळणारी जवळपास २० लाख रुपायांची पावडर व इतर साहित्य जप्त करुन एक आरोपीला अटक केली तर दुसरा आरोपी अजूनही फरार असून,त्या आरोपीला पकडण्यासाठी पथक रवाना केले असल्याची माहिती प्रभारी पोलिस निरीक्षक विक्रांत हिंगे यांनी दिली आहे.शिवाय या दूध भेसळ प्रकरणाची सखोल चौकशी करून आरोपींवर मोका अंतर्गत कारवाई करण्याची मागणी माजी मंत्री सुरेश धस यांनी केली आहे.मात्र तालुक्यातील इतर लोकप्रतिनिधी या प्रकरणी भ्र शब्द काढायला तयार नाहीत त्यामुळे आ.धस यांच्या व्यतिरिक्त बाकी लोकप्रतनिधींची भूमिका या प्रकरणात अळीमिळी गुपचिळी असल्यासारखी दिसून येत आहे.

जिल्ह्यात दुध संकलनात अग्रेसर आसणा-या आष्टी तालुक्यात दुधात भेसळ करण्याचा प्रकार पुन्हा सुरू झाल्याने,दुधाच्या टक्केवारीत वाढ झाल्याचे समोर आले आहे.मध्यंतरी भेसळ माफियांवर कारवाई झाल्यानंतर दुधातील भेसळ करण्याचे प्रमाण कमी झाले होते.माञ अन्न भेसळ खात्याच्या सपशेल दुर्लक्षामुळे दुध भेसळ माफियांनी पुन्हा आपले दुकान थाटले आहे. कृञिम दुधात कॉष्टीक सोडा,युरिया,पामतेल, अँसिड असे शरिराला घातक द्रव्य दुधात मिक्स करून कञिम दुध तयार करतात.त्यामुळे नागरिकांच्या जिवाशी खेळणारा हा आघोरी उद्योग सध्या झपाट्याने वाढत आहे.ज्यांच्याकडे गायाच नाहीत,ते देखील दुधवाले बनले आहेत.त्यामुळे गाया नस-यांकडे दुध नेमकं आलं कुठून अशी चर्चा सर्वञ ऐकावयास मिळत आहे.मागील काही वर्षापासून बीड-नगर राष्ट्रीय महामार्गावरील टाकळी अमिया फाट्याजवळ असलेल्या एका गोडाऊन मध्ये भेसळयुक्त दुधाची गुणवत्ता वाढवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या विविध कंपनीच्या पावडरचा साठा अन्न प्रशासन व आष्टी पोलिसांनी धाड टाकुन जप्त केल्याची कारवाई रविवार दि ४ रोजी पहाटे करण्यात आली.असून आष्टी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.यातील आष्टी तालुक्यातील टाकळी अमिया येथील अंबादास पांडुरंग चौधरी याचे कडा येथील टाकळी अमिया रोडलगत साईदत्त एंटरप्रायजेस नावाने दुकान व लगत पत्र्याच्या शेडमध्ये गोडाऊन आहे.गोपनिय माहितीच्या आधारे अन्न व पोलीस प्रशासनाने रविवारी पहाटे या ठिकाणी धाड टाकली. गोडाऊनची पाहणी केली असता भेसळयुक्त दुधाची गुणवत्ता वाढवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पावडरचा मोठा साठा आढळून आला.या कारवाईने जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे. तर टाकळी अमिया येथे रामदास चौधरी याच्या दुध प्रकिया सेंटर वर देखील ही पावडर आढळून आल्याने ते सेंटर सील करण्यात आले आहे.ही कारवाई जिल्हाधिकारी अविनाश पाठक व अन्न भेसळ च्या अधिकारी यांनी केली होती.

### आरोपीला दहा दिवसांची पोलिस कोठडी

**दरम्यान या कारवाईत अंबादास पांडुरंग चौधरी याला अटक करण्यात आली असुन,आगोदर न्यायालयाने दोन दिवसाची पोलिस कोठडी सुनावली होती.परंतु पोलिसांनी अजून माहिती मिळावी म्हणून पुन्हा न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने दि.१८ ऑगस्ट पर्यंत म्हणजे दहा दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.**

**-विक्रांत हिंगे, प्रभारी पोलिस निरीक्षक आष्टी**

### छापा टाकला पण पुढे काय?

**अन्न औषध प्रशासनाचे अधिकारी भेसळ होत असल्याच्या संशयावरून एखाद्या दुकानावर,दुध संघावर छापा टाकतात.मात्र,एक छापा टाकला तरी त्याच्या तपासणीचे नमुने लवकर प्राप्त होत नाहीत,त्या कारवाईचे पुढे काय होते,हे नागरिक‍ांना समजत नाही. मात्र,अशी कारवाई झाली की संबंधीत भेसळीवाले साहेबांचे हात ओले करतात,त्यानंतर कारवाईला विश्रांती मिळते,फार्स नको तर प्रत्यक्षात कठोर कारवाई करावी,अशी मागणी सर्वसामान्य जनतेकडून केली जात आहे.**

### दुध च नाही तर किराणा दुकानांवरही छापे मारा

**आष्टी तालुक्यात काही छोट्या व्यापारी वर्गाबरोबर तेल आणि दूध विक्रीत काही बडे व्यापारी गुंतले आहेत.या साखळीत अगदी हुबेहूब दिसणारे तेल आणि दूध बनविण्यासाठी हानिकारक केमिकल्सचा वापर होत असल्याची चर्चा आहे.त्यामुळे प्रामुख्याने तेल आणि दूधाचे तालुक्यातील विविध ठिकाणचे नमुने तपासण्याची गरज आहे.**

# मनसेचा स्वबळाचा नारा, माजी खा.शृंगारे यांची अभिवादन यात्रा

## उदगीर विधानसभा निवडणुकीच्या चर्चेत रंगत,अनेक उमेदवारांची बसणार पंगत

## मतदार संघात दिसणार नाही पंजा आणि कमळ, कार्यकर्त्यांची होणार धावपळ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उदगीर । सुनिल बस्वराज हावा**

उदगीर विधानसभा निवडणुकीच्या तयारी साठी सर्वच पक्ष आपापल्या परीने उमेदवार निश्चितीच्या दृष्टीने कामाला लागले आहेत. यातच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आपण स्वबळाने लढणार असे सांगतानाच उदगीर विधानसभा मतदारसंघ मनसेच्या वतीने पूर्ण ताकतीनिशी लढला जाईल, असे जाहीर केले आहे. याच दरम्यान लोकसभा निवडणुकीतील भारतीय जनता पक्षाचे पराभूत झालेले उमेदवार माजी खा. सुधाकर शृंगारे यांनी जिल्हाभर मतदारांनी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे ऋण व्यक्त करण्यासाठी अभिवादन यात्रा काढणार आहेत. उदगीर विधानसभा मतदारसंघात माजी खा. सुधाकरराव शृंगारे यांच्या बद्दल आदराचे वातावरण आहे. लोकसभा निवडणुकीत निव्वळ चुकीच्या नियोजनामुळे आणि अपरिपक्व बुद्धिमत्तेच्या नेतृत्वाच्या हवाली लोकसभा निवडणुकीची जबाबदारी दिल्यामुळे, भाजपला पराभव स्वीकारावा लागला.हे आता सर्वश्रुत झाले आहे,असे कार्यकर्ते बोलू लागले आहेत. लोकसभा निवडणुकीत मतदारांनी आपल्याला मोठ्या प्रमाणात मतदान केले. निवडणूक म्हटल्यास हारजीत तर होतच राहते,मात्र इतक्या मोठ्या प्रमाणात मतदान झाल्यामुळे त्यांचे आभार मानणे आपले नैतिक कर्तव्य आहे या भावनेने माजी खासदार सुधाकर शृंगारे यांनी मतदारांचे ऋण व्यक्त करत,त्यांना अभिवादन करण्यासाठी यात्रा काढणार आहेत. प्रत्येक ठिकाणी कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात माजी खा.सुधाकरराव शृंगारे यांना भेटत आहेत, एक चारित्र्य संपन्न,निस्वार्थ नेता म्हणून त्यांची एक वेगळी ओळख आहे. त्यांनी खासदारकीच्या काळात कधीही, कुठेही भ्रष्टाचाराला खतपाणी घातले नाही, किंवा हप्ते वसुलीच्या भानगडीतही कुण्या कार्यकर्त्याला पडू दिले नाही. त्यामुळे त्यांच्याबद्दलचा आदर सर्वसामान्य माणसांच्या मनामध्ये कायम आहे. अशा परिस्थितीत त्यांच्या दौऱ्याने निश्चितच अनेक राजकीय लोकांच्या भुवया उंचावल्याशिवाय राहत नाहीत.तशातच अनेक कार्यकर्त्यांनी उदगीर विधानसभा मतदारसंघातून माजी खा.सुधाकरराव शृंगारे यांनी निवडणूक लढवावी,असा मतदार संघातील प्रत्येक गावातील कार्यकर्ते त्यांना भेटून आग्रह धरला आहे. मात्र माजी खा.सुधाकरराव शृंगारे यांनी पक्ष श्रेष्ठीचा निर्णय आपण मान्य करू.आजच कोणती वाच्यता करणार नाही, असे स्पष्ट सांगून कार्यकर्त्याला गप्प केले असले तरी,भारतीय जनता पार्टीच्या काही कार्यकर्त्यांच्या आणि नेत्यांच्या चुकीमुळे लोकसभा निवडणुकीमध्ये पराभव झाला आहे. हे प्रत्येक कार्यकर्ता ठासून सांगत होता,आणि त्या नेत्यांनी केलेल्या चुकीची भरपाई करण्यासाठी सुधाकरराव शृंगारे यांना संधी द्यावी.अशी मागणी कार्यकर्त्यातून जोर धरत आहे.

याच दरम्यान काँग्रेस पक्षाने ही स्वतंत्र चूल मांडलेली आज तरी दिसत आहे. काँग्रेस पक्षाच्या इच्छुक उमेदवार मध्ये काँग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते माजी समाज कल्याण सभापती,विद्यमान उदगीर बाजार समितीचे संचालक,संस्थाचालक मधूकर एकुर्केकर आघाडीवर आहेत.यांनीही मतदारसंघात गाठीभेटी घ्यायला आणि मतदारांशी संपर्क साधायला सुरुवात केलेली आहे.मधुकर एकुर्केकर हे देशमुख यांच्या घराण्याशी एकनिष्ठ आणि जवळचे आहेत.भारतीय जनता पक्षातील गलथान कारभारामुळे अनेक नेते, कार्यकर्ते पक्षाला रामराम करत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून माजी आ. सुधाकर भालेराव यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटात जाहीर प्रवेश केला आहे.त्यांच्या पायावर पाय देत गेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपकडून पराभूत झालेले उमेदवार डॉ. अनिल कांबळे यांनी देखील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटात प्रवेश केला आहे. इतरही अनेक कार्यकर्ते प्रवेशाच्या तयारीत आहेत. असे असले तरी निष्ठावंत कार्यकर्ते शरदचंद्रजी पवार यांच्याकडे हट्ट धरून आहेत की, निष्ठावंतांना संधी द्या. आयाराम गयारामांना संधी दिल्यास आपल्यात आणि इतरात काय फरक राहील? असा प्रश्नही उपस्थित करत आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर शरदचंद्र पवार काय निर्णय घेतील? यावर बरेच काही अवलंबून आहे. महायुतीकडून सध्या तरी विद्यमान आमदार तथा राज्याचे क्रीडा व युवक कल्याण कॅबिनेट मंत्री ना.संजय बनसोडे यांची उमेदवारी जवळपास निश्चित समजली जात आहे. ना.संजय बनसोडे यांच्या पाच वर्षांच्या कार्यकाळात विकास पाहिला तर न भूतो न भविष्यंत असा झाला आहे.मागील पन्नास वर्षात जे झाले नाही ते पाच वर्षांत करण्याची किमया केली आहे.उदगीर जिल्हा होण्यासाठी जे जे आवश्यक वास्तु लागतात ती सर्व इमारती केले आहे.कालच सर्वात महत्त्वाचे म्हणजे उदगीरला उप प्रादेशिक परिवहन कार्यालय आनून आता उदगीरला स्वतंत्र चक्र५५ नंबर मिळाल्याने नागरिक उत्साहाच वातावरण आहे.महाराष्ट्रात इतिहास घडावा असा चार हजार कोटींची निधी मतदार संघात उपलब्ध करून घेतला आहे.एवढा मोठा उदगीर विधानसत विकास केल्याने जनता विकासाच्या सोबत राहील,असा विश्वास ना.संजय बनसोडे बोलून दाखवत आहेत. मात्र पुणे येथील कार्यकर्त्याच्या बैठकीत अजित पवार यांनी येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढवल्या जातील, असे सांगितल्याने आता इतर पक्ष ही सावध झाले आहेत. आपण जर विधानसभा एकत्रित निवडणूक लढवून उद्याच्या संभाव्य प्रतिस्पर्धी उमेदवाराला बळ मिळवून दिले तर अनेक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका त्यांचे तेच बळ आपल्या पक्षाचा घात करेल ! अशी भीती अनेक स्थानिक कार्यकर्त्यांना आणि नेत्यांना वाटू लागली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्ष सावधगिरीची भूमिका घेऊन उमेदवार चाचपणी करत आहेत.उदगीर विधानसभा मतदारसंघात महाराष्ट्र नवनिर्माण सेना स्वबळावर निवडणूक लढवणार हे निश्चित असले तरी, अद्याप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आपले पत्ते खुले केले नाहीत. किंवा नेमका कोण उमेदवार राहील? हेही जाहीर केले नाही. त्यामुळे त्यांच्या उमेदवाराचा कोणत्या उमेदवारावर आणि किती परिणाम होईल? हे आज सांगता येत नाही. महाराष्ट्र नवनिर्माण सेना ही या भागात सक्रिय असली तरी निवडून येण्याची शक्ती नाही हे मान्यच करावे लागेल. असे असले तरी कुणाच्या तरी पराभवाला निश्चितपणे कारणीभूत ठरू शकतात. हम तो डूबे हे सनम, आपको भी ले डूबेंगे अशी परिस्थिती होऊ शकते. त्यामुळे त्यांच्या उमेदवारीचा नेमका कोणाला फटका बसेल? हे आज घडीला सांगता येत नाही. तसेच सद्यस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाकडे फारशी ताकद नसतानाही त्यांनी उमेदवारीसाठी हट्ट केल्यास काँग्रेस पक्षाकडून त्यांना कितपत पाठबळ मिळेल? हे सांगता येत नाही. कारण उदगीर विधानसभा मतदारसंघात काँग्रेस पक्ष हा मोठा पक्ष आहे, आणि असे असताना त्या पक्षाला डावलून दुसऱ्या पक्षाला संधी दिल्यास काँग्रेसचे कार्यकर्ते म्हणाव्या त्या ताकतीने लढतील,असे म्हणता येत नाही. कारण येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुन्हा स्वबळावर लढायचे आहेत, आज आपण ज्यांना बळ देऊ तेच, उद्याचे प्रतिस्पर्धी आहेत. ही भावना प्रत्येकाच्या मनात निर्माण झाली आहे. परिणामतः महाविकास आघाडीला झटका बसू शकतो, अशी सर्रास चर्चा चालू आहे. शिवाय अजूनही महायुतीमध्ये अजित पवार गट राहील की नाही? यासंदर्भात साशंकता व्यक्त करणारे विधान राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काही कार्यकर्ते करत असल्याने नेमके किती आणि कोण कोण उमेदवार राहतील? हे निश्चित ठरलेले नसल्याने चित्र स्पष्ट जरी सांगता येत नसले तरी राजकीय लोक गणित मांडत आहेत. आपापल्या पक्षाची ताकद किती? यासंदर्भात वाच्यता करत आहेत. एकंदरीत असे असले तरीही जर माजी खा. सुधाकरराव शृंगारे हे मैदानात उतरले तर मग मात्र निवडणुकीमध्ये मोठी रंगत येणार आहे. इतकेच नाही तर डबघाईला आलेल्या भारतीय जनता पक्षाला संजीवनी देखील मिळू शकेल,अशी चर्चा सध्या चालू आहे.







### कमळ आणि हाताचा पंजा विधानसभेत दिसणारच नाही ?

**इतर वेगवेगळी गणिते जरी सांगितले जात असले तरी जाणकार लोकांच्या दृष्टीने ही निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट अशीच होईल,अशी जोरदार चर्चा आहे.असे झाल्यास या निवडणुकीमध्ये उदगीर विधानसभा मतदारसंघात हाताचा पंजा आणि कमळ हे चिन्ह दिसणारच नाही.कारण हा मतदार संघ महायुतीतून अजित पवार गटाच्या राष्ट्रवादीला तर महाविकास आघाडीतून शरद पवार गटाच्या राष्ट्रवादीला सुटणार आहे.या मतदार संघात दोघांच्या भांडणात तिसऱ्यांचा फायदा होऊ शकतो याकडे कानाडोळा करता येणार नाही. कारण या मतदार संघ राखीव असल्याने अनेक उमेदवार रींगनात आहेत.यात प्रामुख्याने उदगीर तालुक्यातील वाढवणा गावचे सुपुत्र युवा सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल अण्णा जाधव आघाडीवर आहेत.ते सध्या प्रत्येक गावाला भेट देऊन तेथील सामाजिक समस्या जाणून घेऊन घोर गरीब महिलांना साडी वाटप करून आधार देत आहे.गाव तेथे संपर्क कार्यालयाचे उद्घाटन केले आहेत.एक प्रामाणिक, निस्वार्थ सामाजिक कार्यकर्ते म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात आहे. आगामी निवडणुक हि सहजासहजी घेतली जाणार नाही.अशा कार्यकर्त्यांच्या गोंधळामुळे त्याचा फटका स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकात निश्चित बसू शकतो**

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना समितीच्या अध्यक्ष पदी प्रणिता देवरे व सदस्यपदी गंगाप्रसाद यन्नावार यांची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या नांदेड दक्षिण विधानसभा क्षेत्रासाठी गठित करण्यात आलेल्या समितीच्या अध्यक्षपदी भाजपा च्या प्रदेश उपाध्यक्ष प्रणिता ताई देवरे चिखलीकर व अशासकीय सदस्य पदी ड गंगाप्रसाद यन्नावार,ड मारुती पांढरे यांची निवड यांची निवड करण्यात आली आहे.ही निवड जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या सुचनेनुसार एका पत्रकाद्वारे केली आहे.




शासनातर्फे नियुक्त करण्यात आलेल्या या समितीत अध्यक्ष पदी प्रदेश उपाध्यक्षा प्रणिता ताई देवरे चिखलीकर व अशासकीय सदस्य पदी ड गंगाप्रसाद यन्नावार व ड मारुती पांढरे यांची निवड यांची निवड करण्यात आली आहे.

अशासकीय सदस्यांबरोबरच गटविकास अधिकारी, महापालिका, तहसील कार्यालय तसेच बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयातील अधिकाऱ्यांची निवड करण्यात आली आहे.'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' या योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे सुलभतेने होण्यासाठी विधानसभा क्षेत्रनिहाय समिती जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी गठित केली आहे.पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या सूचनेनुसार ही समिती गठीत करण्यात आली आहे,

ही समिती जिल्ह्यात प्राप्त झालेल्या अर्जाची तपासणी करून संभाव्य पात्र लाभार्थी महिलांच्या याद्या जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी काढलेल्या पत्रकात नमूद करण्यात आले आहे.या निवडीबद्दल संघटन मंत्री संजय कौडगे,माजी खा प्रतापराव पाटील चिखलीकर,जिल्हा जिल्हा सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर यांच्यासह सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## ९ ऑगस्ट क्रांती दिनी

# दिव्यांगांच्या एल्गार मोर्चाने व आंदोलनाने जिल्हा प्रशासन हादरले




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

बेरोजगार दिव्यांग कल्याणकृती संघर्ष समीती नांदेड आणि दिव्यांग,वृद्ध निराधार मित्र मंडळ महाराष्ट्र राज्य दिव्यांग आघाडी मुखेड व मुकबधीर कर्णबधिर संघटना आणि ब्लाइंड संघटनेच्या संयुक्त विद्यमाने ९ ऑगस्ट क्रांती दिनी एल्गार मोर्चा व तीव्र स्वरूपाचे आंदोलन आयोजित करण्यात आले होते.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला व स्वातंत्र्य लढ्यात शहिद शुरविरांना अभिवादन करून हा एल्गार मोर्चा सुरू झाला.

मागण्या :

१)आंध्रप्रदेशच्या धर्तीवर संजय गांधी निराधार योजनेतील दिव्यांगांना दरमहा ६ हजार रुपये मानधन देण्यात यावे.

२)सर्व स्थानिक स्वराज्य संस्था नागरी स्वराज्य संस्थांकडील दिव्यांगांचा ५ टक्के निधी दरवर्षी पुर्णतःखर्च करणे

३) आमदार,खासदार यांच्याकडील स्थानिक विकास कार्यक्रम आणि एम्पीलैड्समधील दिव्यांगांचा राखीव निधी दरवर्षी खर्च करणे.

४) दिव्यांगांना अंत्योदय अन्न सुरक्षा योजनेचे शिधापत्रिका देण्यात यावे.

५) दिव्यांगांना विनाअट घरकुल देण्यात यावे.

६) दिव्यांगांना स्वयंरोजगारासाठी शासकीय गाळे व २०० स्केअर फूट जागा देण्यात यावे

७) जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागास इतर शासकीय विभागातील बोगस दिव्यांग कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करणे.

८) दिव्यांगांना राजकीय आरक्षण देण्यात यावे या व इतर विविध मागण्यांसंदर्भात दिव्यांगांचा एल्गार मोर्चा व तिवृ स्वरूपाचे आंदोलन करण्यात आले. जिल्हा परिषद नांदेड यांनी मुख्य दोन्ही गेट बंद केल्यामुळे संतप्त दिव्यांगांनी दोन तास रास्ता रोको आंदोलन केले आणि जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवालसह जिल्हा परीषद प्रशासनाचा निषेध करण्यात आला. त्यानंतर महापालिका कार्यालयात हा मोर्चा धडकला असता सहाय्यक आयुक्त.उपायुक्त यांनी आंदोलनाची दखल घेत मागण्यांची पूर्तता केली त्यानंतर हा मोर्चा थेट जिल्हाधिकारी कार्यालयात धडकला असता जिल्हाधिकारी अभिजीत राऊत हे उपस्थित नसल्याने संतप्त दिव्यांगांनी दोन तास जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुख्य द्वारावर ठिय्या आंदोलन केले असता पोलिस प्रशासनाच्या मध्यस्तीने निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी चर्चेसाठी दिव्यांग शिष्टमंडळाला निवेदन घेऊन येण्यास सांगितले असता संतप्त दिव्यांगांनी यापुर्वीच विविध निवेदने देऊन आताही निवेदन मागता का म्हणत जिल्हाधिकारीसह निवासी उपजिल्हाधिकारी आणि जिल्हा नियोजन अधिकारी,सर्व तहसीलदार जिल्हा पुरवठा अधिकारी यांचा जाहिर निषेध नोंदवून इंग्रज देश सोडून भारतातून गेले पण त्यांचा अत्याचार या शासकीय अधिकाऱ्यांच्या रूपात आजही देशात असल्याचे म्हणत धिक्कार नोंदवत आंदोलन स्थगित केले. या आक्रमक एल्गार मोर्चा व तिवृ स्वरूपाच्या आंदोलनात नांदेड शहर व संपूर्ण जिल्ह्यातील शेकडो दिव्यांग बांधव व भगिनी सहभागी झाल्या होत्या,नांदेड जिल्हा परिषद कार्यालयासमोर रास्ता रोको आंदोलन देखील दिव्यांग बांधवांच्या वतीने करण्यात आले,तसेच समाज कल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार व उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना यावेळी दिव्यांग बांधवांनी धारेवर धरले. एकंदरीत दिव्यांगांच्या या आक्रमक भूमिकेमुळे संपुर्ण जिल्हा प्रशासन हादरून गेले होते.

# उस्वद येथे शिवधारेवर महादेव मंदिराची स्थापना व कलशारोहण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मंठा । प्रतिनिधी**

उस्वद ता.मंठा येथील व्यंकटेश्वर मंदिर परिसरात शिवधारेवर शिवलिंग स्थापना ब्रह्मचैतन्य ह.भ.प. कृष्ण चैतन्य महाराज निळकंठेश्वर यांच्या हस्ते करण्यात आली.

नागपंचमीच्या मुहूर्तावर ह भ प चैतन्य महाराज १००८ यांच्या काल्याचे किर्तन आयोजित करण्यात आले होते.या वेळी गोमुख शिवधारेवर शिव शंकराची मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करून मंदिर उभारण्यात आले व तसेच कलशारोहण करण्यात आले.

आता हेची जेऊ,सवे घेऊ शिदोरी हरिनामाचा खिचडी काला...या अभंगावर किर्तन झाले.नंतर महाप्रसादाचे नियोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला उस्वद व उस्वद परिसरातील बहुसंख्येने भाविकानी महाप्रसादाचा लाभ घेतला वेंकेश्वर महादेव संस्थान पूर्णा तीरावर असून निसर्गरम्य व मनमोहक असे ठिकाण आहे. श्रावणातील पावसाने परिसर जणूकाही हिरवी चादर मोडल्याचा भास होत असतो. पूर्णा नदी पात्र व नदीतील पाणी भाविकांना आकर्षक करीत असते.पुरातन असल्याने येथे लोणार सरोवरा प्रमाणे गोमुख असून हजारोच्या संख्येने भाविक श्रावण मासात गोमुखात स्नान करून व्यंकेश्वर महादेवाचे दर्शन घेतात उस्वद येथील वेंकेश्वर महादेव देवस्थान जागृत असल्यामुळे भाविक भक्त मोठ्या श्रद्धेने श्रावण महिन्यात अभिषेक,पूजा,पाठ करत असतात.दर सोमवारी परिसरातील भाविकांकडून महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते.



# ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्याच्या सुविधा पुरविणार-ना.बनसोडे

## घोणसी परिसारील नागरीकांना मिळणार हक्काची वैद्यकीय सेवा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उदगीर । सुनिल बस्वराज हावा**

उदगीर मतदार संघातील जळकोट तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या गावालगत आरोग्याच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात व गरजू रुग्णांना तात्काळ उपचार मिळावा यासाठी घोणसी, मंगरुळ येथे प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी शासनाकडून निधी उपलब्ध करून दिला. मंगरुळ येथील प्राथमिक केंद्राचे काम पूर्ण झाले तर घोणसीच्या प्राथमिक आरोग्य केंद्राचे आज भुमीपुजन करण्यात आले. कोरोना काळात पहिल्या आमदार फंडातुन १२ रुग्णवाहिका उपलब्ध करुन या भागातील नागरिकांच्या सेवेत दिल्या असुन भविष्यात ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्याच्या सुविधा पुरविणार असल्याचे मत राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.

ते घोणसी ता.जळकोट येथील नवीन प्राथमिक आरोग्य केंद्राच्या भूमीपूजना प्रसंगी बोलत होते.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष संग्राम हासुळे, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष सोमेश्वर सोप्पा, सभापती विठ्ठल चव्हाण, युवक तालुकाध्यक्ष सत्यवान दळवे पाटील, बालाजी मालुसरे, रामराव राठोड, पाणीपुरवठा अभियंता विरभद्र स्वामी, सरपंच चंद्रशेखर पाटील, पोलिस पाटील सोमेश्वर परगे, विनायक जाधव, जिल्हा आरोग्य अधिकारी एच.व्ही.वडगावे, गटविकास अधिकारी नरेंद्र मेडेवार, तालुका आरोग्य अधिकारी संजय पवार, डॉ.प्रशांत कापसे, नगरसेवक ड. तात्या पाटील, खादर लाटवाले, रामराव राठोड, श्रीनिवास पाटील, संतोष पवार, नायब तहसीलदार राजाराम खरात, गजानन दळवे, सरपंच यादवराव केंद्रे, रवी चोले, गोविंद भ्रमण्णा आदी उपस्थित होते.पुढे बोलताना ना.संजय बनसोडे यांनी, या भागातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणाऱ्या तिरू नदीवर ७ बॅरेजेसची उभारणी करुन पाणी अडवुन शेतक-यांच्या जीवनात आर्थिक क्रांती केली आहे. येत्या काळात आपला शेतकरी बांधव हा सुखी होईल. या बॅरेजेसमुळेया भागातील विहिरींची पाणीपातळी वाढत आहे. त्यामुळे आगामी काळात या भागातील शेतकरी सुजलाम सुफलाम् होणार आहे. तालुक्यातील सर्व रस्ते हाँटमिक्सने जोडले गेले आहे. उदगीर बरोबर जळकोट तालुक्याला कोट्यवधी रुपये मंजूर करुन विविध इमारती उभारल्या. भविष्यात रस्ते,वीज, पाणी याची मतदार संघातील जनेतला अडचण होणार नाही याची काळजी घेवुन सर्व कामे केली आहेत. आगामी काळात तालुक्यातील प्रत्येक गाव हे विकासाचे मॉडेल गाव म्हणून विकसित करण्यासाठी पुढाकार घेणार असल्याची ग्वाही ना.बनसोडे यांनी दिली.कार्यक्रामचे प्रास्ताविक प्रा.शाम डावळे यांनी केले तर आभार दीपक आम्रे यांनी आभार मानले.यावेळी घोणसी सह परिसरातील सरपंच, उपसरपंच व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री संत सेवालाल महाराज बंजारा,लमान तांडा समृद्धी योजनेच्या सदस्यपदी राठोड यांची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

महाराष्ट्रातील बंजारा समाजाचा गेला ७५ म्हणावा तसा विकास झाला नाही. आजही वाडी तांड्यावर मूलभूत सुविधा नसल्याने येथील नागरिकांना मोठी कसरत करावी लागत आहे. तांड्याला ग्रामपंचायतचा दर्जा मिळाल्याशिवाय या गावचा विकास होऊ शकत नाही ही बाब बंजारा समाजाच्या लक्षात आली असल्याने गेल्या अनेक वर्षापासून स्वातंत्र्य ग्रामपंचायत दर्जा द्या या पद्धतीची मागणी केली होती. यावर शासनानेसंत सेवालाल महाराज बंजारा,लमान तांडा समृद्धी योजना ची नव्याने निर्मिती केली आहे. या योजनेच्या सदस्यपदी भगवान राठोड यांची निवड करण्यात आली आहे,



महाराष्ट्रात अनेक दांड्यावर बंजारा समाज हा मोठ्या प्रमाणात राहत आहे परंतु त्या समाजाचा मनावा तसा विकास झाला नाही. आजही अनेक दांड्यावर पिण्यासाठी पाणी रस्ते लाईटची कोणत्याच मूलभूत सुविधा नसल्याने यातील नागरिकांना मोठ्या समस्यांचा सामना करावा लागत आहे.यासाठी बंजारा समाजाच्या वतीने शासनाकडे ग्राम या तांड्यांना स्वातंत्र्य ग्रामपंचायतच्या दर्जा द्यावा अशी मागणी वारंवार करण्यात आली होती. यावर महायुतीच्या सरकारने बंजारा समाजाला विविध माध्यमातून न्याय देण्याचे काम केले आहे.

बंजारा समाजाची काशी, बंजारा समाजाचे आराध्य दैवत संत सेवालाल महाराज यांची समाधी स्थळ,भारतातील बंजारा बांधवाचे श्रद्धास्थान असलेले पोहरादेवी या तीर्थ क्षेत्राच्या,विकासासंदर्भामध्ये भरीव निधी दिला असुन मंदिर पुनर्निर्माणा चे काम चालू आहे.श्री संत सेवालाल महाराज बंजारा,लमान तांडा समृद्धी योजनेची नव्याने स्थापना करून बंजारा समाजाला या माध्यमातून न्याय देण्याचे काम केले आहे.

या योजनेच्या माध्यमातून पुढील काळात चांगले काम होणार आहे. जिल्हास्तरावर तांड्याना मूलभूत सोई सुविधा पुरविणे,त्याच बरोबर बंजारा, लमान तांड्याना महसूल दर्जा देऊन स्वतंत्र ग्रामपंचायत निर्माण करण्याचे काम ही समिती करणार आहे,या समितीवर महाराष्ट्रातील १४० बंजारा समाजातील कार्यकर्त्यांची नियुक्ती करून काम करणार आहे. ही नवीन योजना अस्तित्वात आण्यासाठी मंत्रालय स्तरावर काम करणारे बंजारा समाजाचे उच्चं पदस्थ अधिकारी, सचिव, ग्रामविकास विभागाचे अधिकारी यांनी अहोरात्र काम केले आहे. या समितीचे अध्यक्ष जिल्हा परिषद कार्यकारी अधिकारी हे राहणार असून कार्यकर्ते हे अशासकीय सदस्य म्हणून राहणार आहेत. यात लोहा - कंधार मतदारसंघातून भाजपचे भगवान राठोड यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. या झालेल्या निवडीबद्दल त्यांचे सर्व क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.

> **महाराष्ट्रातील संत सेवालाल महाराज बंजारा, लमाण तांडा समृद्धी योजना अंतर्गत जिल्हा स्तरीय समितीवर नियुक्ती झालेल्या सर्व सहकाऱ्यांसोबत मिळून समाजाला अपेक्षित काम करू, येणाऱ्या काळात समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न नक्कीच करू,या महत्त्वाच्या समितीवर माझ्यासारख्या सामान्य कुटुंबातील कार्यकर्त्यांना संधी देऊन बंजारा समाजाच्या प्रश्नावर काम करण्याची संधी दिल्याबद्दल मी आपला खूप खूप आभारी आहे.या समितीच्या माध्यमातून बंजारा समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न नक्कीच करणार आहे.**

# जुन्नर तालुका माध्यमिक शिक्षक संघ, शिक्षिका संघ व शिक्षक लोकशाही आघाडी ची नूतन कार्यकारिणी जाहीर



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**जुन्नर । मयूर ढोबळे**

जुन्नर तालुका माध्यमिक शिक्षक संघ , जुन्नर तालुका माध्यमिक शिक्षिका संघ व जुन्नर तालुका शिक्षक लोकशाही आघाडी यांच्या पदाधिकाऱ्यांची सहविचार सभा चैतन्य विद्यालय ओतूर या ठिकाणी राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संयुक्त महामंडळाचे अध्यक्ष केरभाऊ ढोमसे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाल्याची माहिती पुणे जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे सचिव पंकज घोलप यांनी दिली.या सहविचार सभेत विद्यमान कार्यकारिणीचा कार्यकाळ संपल्याने नूतन कार्यकारणीची निवड सर्वानुमते एकमताने करण्यात आली .

**जुन्नर तालुका माध्यमिक शिक्षक संघ नवनियुक्त कार्यकारिणी पुढीलप्रमाणे**

अध्यक्ष-संतोष सहाणे ; कार्याध्यक्ष-ज्ञानेश्वर केंद्रे ; कार्यवाह-संतोष कांबळे ; जिल्हा प्रतिनिधी-पंकज घोलप , रमेश ढोमसे, राजेंद्र सुतार ; उपाध्यक्ष-हिरामण शिंगोटे , रामदास डुंबरे, विजय घोलप, सुरेश लांडे ; सहकार्यवाह - जगन्नाथ गाढवे, किशोर पगार ; खजिनदार - रमेश मालुंजकर ; सहखजिनदार-प्रकाश जोंधळे, प्रमोदकुमार जाधव, विकास गोसावी ; आयव्यय निरीक्षक- प्रमोद मुळे ; महिला प्रतिनिधी-जयश्री चौधरी, अर्चना भारती ; संघटक - संतोष देवकुळे , जयराम मटाले, विष्णू आहेर ; सल्लागार - जी. के. औटी, धोंडीभाऊ मानकर

**जुन्नर तालुका माध्यमिक शिक्षिका संघ नवनियुक्त कार्यकारिणी पुढीलप्रमाणे**

अध्यक्ष-सविता ताजणे ; कार्याध्यक्ष-शोभा तांबे ; कार्यवाह- अर्चना भारती ; जिल्हा प्रतिनिधी - जयश्री चौधरी, सरिता आबक, उषा सावंत ; उपाध्यक्ष - कमल शिरोळे, सरिता कलढोणे , रुपाली आवारी, वनिता निलख ; सहकार्यवाह- सुवर्णा नांगरे, जयश्री कदम , आसावरी गायकर , उषा भारती ; खजिनदार - राजश्री लोहोटे ; सहखजिनदार - संगीता गाडेकर , सारिका नलावडे , सुषमा बनकर ; आयव्यय निरीक्षक - साधना जुन्नरकर ; निरीक्षक -सुनिता फापाळे ; प्रवक्ता - वनिता भोर ; संघटक - स्मिताली चव्हाण, सोनाली कांबळे ; प्रियंका वर्पे, संपदा डुंबरे ; सल्लागार- राजश्री भालेकर , निर्मला भोर

**जुन्नर तालुका शिक्षक लोकशाही आघाडी नवनियुक्त कार्यकारिणी पुढीलप्रमाणे**

अध्यक्ष-संदीप दातीर ; कार्याध्यक्ष-रविंद्र डुंबरे ; कार्यवाह- प्रशांत घुले ; जिल्हा प्रतिनिधी- प्रदीप गाढवे, माऊली अडागळे , मो .हनीफ शेख ; उपाध्यक्ष- भाऊसाहेब खाडे , मंगेश डुंबरे , धीरजकुमार सोनवणे , संजय कालेकर ; सहकार्यवाह - सुनिल पोकळे , प्रदीप सुर्यवंशी ,तुषार आहेर ; खजिनदार - बाळकृष्ण लोहकरे ; सहखजिनदार -निसार इनामदार, योगेश गाढवे , कैलास दाभाडे ; आयव्यय निरीक्षक विश्वास भालिंगे ; महिला प्रतिनिधी - सरिता आबक , उषा सावंत ; निरीक्षक- किरण औटी ; संघटक - चंद्रकात दुरगुडे , अरुण बर्डे , भरत दिघे, अरुण मातेले ; सल्लागार - नाना भोर , अरुण भोजणे


**जुन्नर तालुका सेवानिवृत्त माध्यमिक शिक्षक संघ नवनियुक्त कार्यकारणी पुढीलप्रमाणे**

अध्यक्ष -विजय घोलप ; कार्याध्यक्ष - रोहिदास वेठेकर ; कार्यवाह - तान्हाजी वामन याप्रसंगी निवडणूक अधिकारी म्हणून राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संयुक्त महामंडळाचे अध्यक्ष केरभाऊ ढोमसे, पुणे जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे कार्यवाह पंकज घोलप, खजिनदार प्रदीप गाढवे, टी. डी. एफ पुणे चे सचिव मुरलिधर मांजरे, खेड तालुका टी.डी . एफ चे अध्यक्ष सत्यवान ठाकूर यांनी काम पाहिले.

# प्रदीप गित्ते सेट परीक्षा उत्तीर्ण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



कंधार तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मानसिंगवाडी येथे कार्यरत असलेले सहशिक्षक प्रदीप भानुदासराव गित्ते यांनी नुकतीच सेट परीक्षेत उत्तीर्ण होऊन यश संपादन केले आहे.

महाराष्ट्र शासनाने माहे एप्रिल २०२४ मध्ये घेतलेल्या सेट परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे येथून प्रदीप भानुदासराव गिते हे शिक्षणशास्त्र या विषयात सेट परीक्षा उत्तीर्ण होऊन सहायक प्राध्यापक पदासाठी पात्र झाले आहेत.

या यशा बद्दल गटशिक्षणाधिकारी संजय येरमे, शिक्षण विस्तार अधिकारी बी. एन. केंद्रे, केंद्र प्रमुख एम.एम. पांचाळ, मुख्याध्यापक व्ही. जी. कल्याणकर, हनमंत जोगपेटे तालुका अध्यक्ष अखिल शिक्षक संघटना कंधार, मुनेश शिरसीकर जिल्हा उपाध्यक्ष अखिल शिक्षक संघटना नांदेड यांच्यासह सर्व शिक्षक बांधवाकडून कौतुक केले जात आहे.

# मला आमदार झाल्या सारख वाटतय

## इच्छुकांना लागले आमदारकीचे डोहाळे, इच्छुकाचे गुडघ्याला बाशिंग बांधून तिकिटासाठी धावपळ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

हिंगोली विधानसभा तोंडावर आहे तिकीट मिळो अथवा ना मिळो इच्छुकाचे मात्र सध्या अच्छे दिन आहेत सध्या हिंगोली विधानसभा ही तोंडावर आली असून आजी-माजी व भावी आमदाराची हिंगोली मध्ये कमी नाही याच विधानसभेसाठी डझनभर इच्छुक तिकिटासाठी वरवर करतात हिंगोली विधानसभा मतदारसंघातील अनेकांना आमदार व्हायचं स्वप्न बघतात, तुम्ही म्हणाल नेमकं इच्छुक कोण, गुडघ्याला बासिंग बांधलेले कोण, कर्तव्य लक्ष कोण ,अपेक्षा ठेवून असणारे किती असा शोध घेतल्यानंतर आता अधिकाधिक स्वयंघोषित नेते इतर पक्षात चादरी उचलणारे कार्यकर्ते यांना बहुंदा आमदार व्हायचं दिसून येतेय अनेक इच्छुक आमदारकीच्या टिकीटासाठी पक्षश्रेष्ठाकडे पायघड्या घालताना दिसून येत आहे सोबत मंत्री घेऊन चहापाणी अजून माझ्या मागे खूप आहेत असा दावा दाखवण्याचा काहीचा प्रयत्न सुरू असल्याच दिसत आहे आता मुद्दा हा आहे की पक्ष तिकीट किती जणांना देणार तिकीट मागणाऱ्याची ही मंत्री केवळ भाजपाचा नाहीतर काँग्रेस ,राष्ट्रवादी शिवसेना, वंचित व इतर पक्षातही आहेत भाजपच्या इच्छुकाला लाटेचा तरी आधार मिळे पण इतराचे काय,,राग आला तर नाराज होऊ नये सध्याही परिस्थिती आहे,



# बार्टी कार्यालय समोर पीएचडी संशोधकाने केला आत्मदहणाचा प्रयत्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे । प्रतिनिधी**

एका बाजुला सन २०२२ च्या सारथी ८५१ व महाज्योती १२३६ संशोधक पिएच.डीच्या विद्यार्थ्यांना मुख्यमंत्री महोदयांच्या माध्यमातून सुमंत भांगे फेलोशिप १०० टक्के देऊन तब्बल २ वर्ष होत आले तर दुसऱ्या बाजुला बार्टी २०२२ च्या पात्र ७६३ संशोधक विद्यार्थ्यांची पिएच.डीसाठी नोंदणी होऊन आडीच वर्षाचा कालावधी होऊन गेला तरी पण अनुसूचीत जातीचे बार्टी २०२२ चे संशोधक विद्यार्थी गेल्या आडीच वर्षापासुन पुणे ११० दिवस बार्टी कार्यालय पुढे आंदोलन,मुंबई आझाद मैदान ६० दिवस आंदोलन ,पुणे ते मुंबई मुसळधार पावसात लाँग मार्च काढुनही या महाराष्ट्रात बार्टीकडे अनुसूचीत जातीचा विद्यार्थी हक्काचा निधी असतानाही बार्टी २०२२ च्या पात्र ७६३ संशोधकांना नोंदणी दिनांकापासुन विद्यार्थी फेलोशिपची मागणी करत असताना.सारथी व महाज्योतीच्या २०२२ च्या विद्यार्थ्यांना १००% फेलोशिप देऊन वर्ष झाल्यानंतर राज्यसरकार बार्टी २०२२ च्या पात्र ७६३ संशोधक विद्यार्थ्यांना फक्त ५० % फेलोशिप ते पण ऑवार्ड लेटरपासुन मंजुर करण्याचे राज्यसकार निर्णय घेऊन अनुसूचीत जातीच्या विद्यार्थ्यांवर शिंदे,फडनवीस,पवार सरकार अन्याय करुण झरीतील शुक्राचार्य असलेल्या अनुसूचीत जाती विद्यार्थी विरोधी भुमिका घेणाऱ्या सुंमत भांगेच्या माध्यमातून सन २०२२ च्या सारथीच्या ८५१ व महाज्योतीच्या १२३६ संशोधकाना २ वर्षाखाली १००% फेलोशिप देण्यात आलेली समान



न्यायाच्या नावाखाली बार्टी २०२२ च्या विद्यार्थ्यांबरोबर ५०% मंजुर केल्याचे शिंदे,फडनवीस,पवार सरकार निर्णय झाल्याचे कागदोपत्री सचिवांच्या माध्यमातून दाखवण्याचा राज्यसरकारचा केवीलवाना प्रयत्न दिसुन येते व कशा प्रकारे राज्यसरकार बार्टी २०२२ च्या पात्र ७६३ संशोधक विरोधी भुमिका घेऊन अनूसूचीत जातीच्या विद्यार्थ्यांच शैक्षणिक आयुष्य ऊध्वस्त करुण,त्यांच्या हक्काचा निधी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेकडे वळऊन ,अनुसूचीत जातीच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक,आर्थिक कोंडी करुण शिंदे,फडनवीस,पवार कर्मठ अनुसूचीत जातीच्या बार्टी २०२२ च्या ७६३ पात्र संशोधकाना नोंदणी दिनांकापासुन जाणिवपुर्वक फेलोशिप १००% न देण्याच जातीयद्वेशापोटी भुमिका घेताना दिसुन येत आहेत.तरी या अन्याया विरोध्दात बार्टी २०२२ चे पात्र ७६३ संशोधक ५०% फेलोशिपच्या अन्यायकारक निर्णयाची बार्टी कार्यालयापुढे होळी करुण संतप्त विद्यार्थी बार्टी कार्यालयाचे गेट ला रस्तारोको आंदोलन करत असताना विद्यार्थ्यांनी बार्टी कार्यालय पुणे येथे आत्मदहणाचा प्रयत्न केला व पोलिस प्रशासनाच्या सतर्कतेमुळे वाचला संशोधकाचा जिव गेल्या ५ ऑगस्ट २०२४ पासुन न्यायाच्या प्रतीक्षेत बार्टी कार्यालयपुढे आमरण उपोषणास विद्यार्थी बसल्यामुळे त्यांची प्रकृती अत्यंत खालावली आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904